I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नाशिक शहर  P.S. (पोलीस ठाणे): उपनगर  Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0459  Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 19/07/2026 06:37 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): शनिवार  Date from (दिनांक पासून): 18/07/2026  Date To (दिनांक पर्यंत): 18/07/2026

Time Period (कालावधी):  Time From (वेळेपासून): 11:26 तास  Time To (वेळेपर्यंत): 18:18 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):  Date (दिनांक): 19/07/2026  Time (वेळ): 06:08 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):  Entry No. (नोंद क्र.): 008  Date and Time (दिनांक आणि वेळ): 19/07/2026 06:08 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): तोंडी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 02 कि.मी.  Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): बिटको पोलिस चौकी उपनगर पोलिस, स्टेशन नाशिकरोड नाशिक,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)



Scanned with CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): रुपाली रामू खांडवी

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1987

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, नाशिक, उपनगर, नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, नाशिक, उपनगर, नाशिक शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8379961020



Scanned with CamScanner

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद हिरामण शेजवळ | | | 1. व्हीजन अकॅडमीच्या मागे,Town/Village (शहर / गाव): मिलिंद रो हाऊस नं 17 जेलरोड,Tehsil (तहसील): नाशिकरोड नाशिक,Police Station (पोलीस ठाणे): उपनगर,District (जिल्हा): नाशिक शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेश मुकुंदा कुमावत | | | 1. फ्लॅट नं 18 कुलस्वामी,अपार्टमेंट औटी मळा,Town/Village (शहर / गाव): सामनगावरोड नाशिक,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): उपनगर,District (जिल्हा): नाशिक शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराच्या 20 नोटा | 10,000.00 |



Scanned with CamScanner

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 10,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद गुन्हा रजि नं 459/2026 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे
उपनगर पो. स्टे.नाशिक शहर,

दिनांक-19.07.2026.

मी रुपाली रामू खांडवी, वय- 39 वर्षे , पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक. सरकार तर्फे फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे 1 वर्षांपासुन कार्यरत आहे.

दि.18.06.2026 रोजी आम्ही कर्तव्यावर हजर असतानां वरिष्ठांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार खंडु मधुकर माळी, रा.-दाढेगांव, पिंपळगांव खाब, ता.जि. नाशिक यांची उपनगर पोलीस स्टेशन येथील लोकसेवक पोलीस हा लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हांस आदेशित केल्याने आम्ही मा. सह जिल्हा निबंधक, वर्ग -1 तथा मुद्रांक जिल्हा अधिकारी कार्यालय, नाशिक यांना पत्र देवुन त्यांच्याकडुन श्री. संजय धुडकु पवार व श्री. लालकृष्ण गोविंदराव सोनवणे यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही, दोन्ही पंचांना, आमची, तक्रारदार खंडु मधुकर माळी, रा.- दाढेगांव, पिंपळगांव खाब, ता.जि. नाशिक व सापळा पथक यांची ओळख करुन देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तेव्हा तक्रारदार खंडु माळी यांनी आम्हांस पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे....

समक्ष हजर राहुन तक्रार लिहुन देतो की, मी दाढेगांव येथील रहिवाशी आहे. माझी बहीण वनिता बाळु पवार हि विवाहित असुन ती तिच्या पती सोबत दाढेगांव येथे राहत होती. माझे दाजी बाळु दगडु पवार यांनी दि. 15/07/2026 रोजी घराशेजारील जंगलातील झाडास गळफास घेवुन आत्महत्या केली असुन उपनगर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद झाली असुन त्यांची चौकशी चालु आहे.

दि. 16/07/2026 रोजी 10/00 वा. रोजी उपनगर पोलीस स्टेशनचे पोलीस कुमावत यांनी मला उपनगर पोलीस स्टेशनची बिटको चौकी येथे बोलावुन "तुमच्या दाजीने तुमच्या जाचाला कंटाळुन आत्महत्या केली असुन तुम्हाला 30,000/-रुपये दयावे लागतील नाही तर आम्ही सरकारतर्फे तुमच्यावर आत्महत्येस प्रवृत केल्याचा गुन्हा दाखल करु. सदर आत्महत्या केल्याचे प्रकरण हे मी काम करीत असलेल्या शेजवळ साहेबांकडे आहे." असे मला सांगितले. त्यानंतर दि. 17/07/2026 रोजी पोलीस कुमावत यांनी माझे मोबाईलवर फोन करुन बिटको चौकीला येण्यास सांगितले. तसेच



Scanned with CamScanner

मला पोलीस शेजवळ साहेबाचा फोन येईल असे सांगितले. त्यानंतर लागलीच पोलीस शेजवळ साहेब यांचा मला फोन आला व त्यांनी सदरचे प्रकरण मिटविण्यासाठी माझेकडुन 30,000/-रु पैसे मागितले व बिटको चौकीला येण्यास सांगितले.

पोलीस शेजवळ साहेब व पोलीस कुमावत हे मला गुन्हा दाखल करण्याची भिती दाखवुन माझेकडे लाचेची रक्कम मागणी करीत आहे. मला पोलीस शेजवळ साहेब व पोलीस कुमावत यांना त्याच्या सांगण्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. परंतु त्यांना पैसे दिले नाही तर ते माझेवर गुन्हा दाखल करतील. माझा त्यांच्याशी कोणताही वाद नसुन त्यांच्याशी उसनवारीचा अथवा इतर आर्थिक व्यवहार नाही.

मी आज दि. 18/07/2026 रोजी उपनगर पोलीस स्टेशन बिटको चौकी येथे पोलीस शेजवळ साहेब व पोलीस कुमावत यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामार्फत कारवाई होणेस विनंती आहे. सदरची तक्रार आम्ही व दोन्ही पंचांनी वाचुन सदर तक्रारी अर्जावर सह्या केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक असे शासकीय वाहनाने व तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकीने ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन कन्या विद्यालयाजवळील, जेलरोड, नाशिक येथे पोहचलो. तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचाना सुचना देवुन तक्रारदार यांचेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तक्रारदार व पंच नं. 01 श्री. संजय धुडकु पवार यांना तक्रारदार काम करीत असलेल्या शेठचा माणुस म्हणुन स.पो.उप.निरी. मिलींद शेजवळ व पो.कॉ. गणेश कुमावत यांची भेट घेण्यासाठी उपनगर पोलीस स्टेशनची बिटको चौकी येथे सुचना देवुन तक्रारदार याचेकडे व्हाईस रेकॉर्ड सुरु करून देवुन कन्या शाळेच्या समोर, जेलरोड, नाशिक येथुन तक्रारदार यांचे दुचाकी क्रं. एम.एच. 15, के.टी. 2484 ने रवाना केले. काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 पवार असे सपोउनिरी. मिलींद शेजवळ व पो.कॉ. गणेश कुमावत यांची भेट घेवुन आमचे जवळ परत आले असता व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पंच 01 पवार यांना रवाना केल्यापासुनची हकिगत विचारली असता, त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने आपल्यापासुन रवाना होवुन उपनगर पोलीस स्टेशन येथे गेलो तेथे तक्रारदार व सपोउनि शेजवळ व पोलीस कुमावत यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांचे दाजी यांच्या आत्महत्या प्रकरणाबाबत चर्चा होवुन तक्रारदार यांची पैसे देण्याची ऐपत नसल्याचे सांगुन विनवनी करीत होते. तेव्हा चर्चे दरम्यान सपोउनि शेजवळ व पोलीस कुमावत यांनी तक्रारदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा धाक दाखवुन 30,000/-रु लाचेची मागणी करुन तक्रारदारास पुन्हा पाच ते साडे पाच वाजेच्या सुमारास बिटको चौकीला येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे आपलेकडे दुचाकीने परत आले अशी हकिगत सांगितली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार व स.पो.उप.निरी. मिलींद शेजवळ व पो.कॉ. गणेश कुमावत यांचेतील संभाषण ऐकुन स.पो.उप.निरी. मिलींद शेजवळ व पो.कॉ. गणेश कुमावत यांनी तक्रारदार यांच्याकडे 30,000/-रु लाचेची मागणी केल्याची खात्री झाल्याने पुढील कार्यवाही ला.प्र.वि. नाशिक कार्यालयात करण्याचे ठरविले.

ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयात येवुन तक्रारदार व सपोउनि शेजवळ, पोकॉ कुमावत यांच्यात झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट तयार करण्यात येवुन त्यावर आम्ही व पंचानी सह्या केल्या. त्यानंतर



Scanned with CamScanner

आम्ही सापळा लावण्याचा आयोजित केला असता, तेव्हा तक्रारदार यांच्याकडुन 500/-रुपये दराच्या 20 नोटा असे एकुण 10,000/-रुपये सापळाकामी घेवुन सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक असे शासकीय वाहनाने व तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकीने ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन जलतरण तलावरोड, गुरुव्दाराजवळ, बिटको येथे पोहचलो. त्यानंतर तक्रारदार व पंच नं. 01 पवार यांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार याचेकडे व्हाईस रेकॉर्ड सुरु त्यांना तक्रारदार यांच्या दुचाकीने उपनगर पोलीस स्टेशनची बिटको चौकी येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 व सापळा पथक असे बिटको चौकशी परिसरात आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी बिटको चौकीच्या बाहेर येवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथकाने सपोउनि शेजवळ, पोकॉ कुमावत यांना ताब्यात घेवुन व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 लालकृष्ण सोनवणे यांनी मिलींद शेजवळ यांनी लाचेची रक्कम 10,000/-रु (पहिला हप्ता) स्विकारुन ती त्यांच्या मो.सायकल क्रं. एम.एच.15, ए.एन. 8645 च्या डिक्कीत ठेवलेली ताब्यात घेवुन फोटो घेण्यात आले. त्यानंतर ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालयात येथे येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार यांचे दाजी यांनी दिनांक 15/07/2026 रोजी घराशेजारील जंगलातील झाडास गळफास घेवुन आत्महत्या केली असुन, उपनगर पो. स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद झाली असुन त्यांची चौकशी चालु असताना त्याअनुषंगाने उपनगर पो. स्टेशनचे सपोउनि शेजवळ, पो.कॉ. कुमावत यांनी तक्रारदार यांना उपनगर पो. स्टे.ची बिटको चौकी येथे बोलावुन तक्रारदारास सांगितले की, "तुमच्या दाजीने तुमच्या जाचाला कंटाळुन आत्महत्या केली असुन तुम्हाला 30,000/-रुपये द्यावे लागतील. नाही तर आम्ही सरकारतर्फे तुमच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करु असे सांगुन लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती. सदर तक्रारीची दि. 18.07.2026 रोजी 11/26 वा. ते 12/07 वा. दरम्यान पडताळणी केली असता, सपोउनि शेजवळ, पो.कॉ. कुमावत यांनी तक्रारदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा धाक दाखवुन 30,000/-रु लाचेची मागणी करुन तक्रारदारास पुन्हा पाच ते साडे पाच वाजेच्या सुमारास बिटको चौकीला येण्यास सांगितले. त्याअनुशंगाने सापळा कारवाईचे आयोजन केले असता, दि. 18.07.2026 रोजी 18/07 वा. ते 18/18 वा. दरम्यान सपोउनि शेजवळ यांनी तक्रारदार यांचेकडुन 30,000/-रु लाचेचा पहिला हप्ता 10,000/-रु लाचेची रक्कम स्विकाली म्हणुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी स.पो.उ.निरी. मिलींद हिरामण शेजवळ व पो.अं./2340गणेश मुकुंदा कुमावत यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

दाखल करणारे अधिकारी- पोहवा 40 लखन नेमणुक- उपनगर पोलीस स्टेशन नाशिक शहर

पुढील तपास ---पोलिस उपअधिक्षक सुरेश शिरसाठ नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** vinod babu lakhan **Rank (हुद्दा):** पोलीस हवालदार

**No. (क्र.):** 40 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले)**

**or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Digitally Signed by: JAYANT BHARAT SHIRSATH
Rank: I (Inspector)
Unique No: 72249408041330007
On: 7/19/2026 6:44:20 AM
At PS: UPANAGAR POLICE STATION, NASHIK CITY

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Jayant Bharat shirsath

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**



Scanned with CamScanner

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्म तारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1970 | | | | चेचक: होय |
| 2 | पुरुष | 1988 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**



Scanned with CamScanner